दैनिक भास्कर

2023-10-06
धुळे सिटी (4)

साक्षरता कार्यशाळा • शहादा येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मार्गदर्शन

# सायबर सुरक्षेसंदर्भात २१०० विद्यार्थ्यांना दिले धडे

प्रतिनिधी | शहादा

पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून क्विक हिल फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य सायबर पोलिस विभाग, संगणकशास्त्र विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या सहयोगाने परिसरातील विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये सायबर साक्षरता कार्यशाळा झाली.

पूज्य साने गुरुजी मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कृषि महाविद्यालय, तंत्रनिकेतन महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालय, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कस्तुरबा बालिका विद्यालय आणि श्री सातपुडा विद्यालय येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनी गायत्री ठाकरे व श्रेया भोम्बे यांनी सायबर गुन्ह्यापासून तसेच त्याद्वारे होणाऱ्या फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासंबंधी विस्तृत माहिती दिली. या जनजागृती कार्यक्रमात एकूण २१४७ विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी माहिती जाणून घेतली व प्रातिनिधिक स्वरूपात अभिप्राय दिला. कार्यक्रमात प्रत्येकाने सायबर सुरक्षा शपथ घेऊन आपण व आपल्या परीजनांना सायबर धोक्यापासून बचावासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार केला. या कार्यक्रमाचे आयोजनासाठी मंडळाचे समन्वयक प्राचार्य मकरंद पाटील, प्राचार्य प्रा. डॉ. आर.एस. पाटील आणि जळगाव विद्यापीठाचे सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रमाचे समन्वयक डॉ. राजू आमले यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळा यशस्वितेसाठी प्राचार्य प्रा. डॉ. एस. पी. पवार (औषधनिर्माणशास्त्र), प्राचार्य प्रा. एन. जे. पाटील (अभियांत्रिकी), प्राचार्य डॉ. बी. के. सोनी (तंत्रनिकेतन), प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील (आय. टी. आय.), प्राचार्य डॉ. प्रकाश पटेल (कृषि), मुख्याध्यापिका नीलिमा पाटील (कस्तुरबा विद्यालय) आणि मुख्याध्यापक एस. आर. पाटील (सातपुडा विद्यालय) यांचे सहकार्य लाभले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. वर्षा चौधरी, डॉ. वजीह अशहर व रासेयो स्वयंसेवकांनी यशस्वितेसाठी प्रयत्न केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले. रासेयो स्वयंसेविका हिनल पटेल हीने आभार मानले.



सायबर सुरक्षा कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करताना विद्यार्थिनी.